# सावरकरांची पत्रे

## आता मृत्यूचे स्वागत करावे?

### आणि

## नेपाळी व लिपि सुधारणा आंदोलन

**लेखक**

हिंदुहृदयसम्राट स्वातंत्र्यवीर

**विनायक दामोदर सावरकर**

**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

---

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**सावरकरांची पत्रे : विनायक दामोदर सावरकर**

**© हिमानी सावरकर**

**जनआवृत्ती संकल्पना : श्री. नानासाहेब गोडसे**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब-३०, शीतल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
श्री ज्योतिर्लिंग ऑफसेट, कोल्हापूर.

**दुसरी आवृत्ती**
मे, २०१२ - २००० प्रती

**किंमत**
जनआवृत्ती रुपये १००/-

# सावरकरांची पत्रे
## आता मृत्यूचे स्वागत करावे?
## आणि
## नेपाळी व लिपि सुधारणा आंदोलन

## अनुक्रमणिका


- सावरकरांची पत्रे / ७
- आता मृत्यूचे स्वागत करावे? / २५
- नेपाळी आंदोलनाचा उपक्रम / ३१
- लिपि सुधारणा आंदोलन / १५५


✦✦✦

# सावरकरांची पत्रे

# सावरकरांची पत्रे

## पत्र पहिले

(साप्ताहिक बलवंत दि. २९-४-१९२५)

।। अकरणात्मंदकरणं श्रेय: ।।

गेल्या शिवोत्सवाचे वेळी आता आपल्या लोकांनी नुसत्या सभा, अुत्सव, परिषदा यातच सर्व वेळाचा, पैशाचा व शक्तीचा अपव्यय करीत न बसता थोडे का होअीना पण काही तरी कार्य प्रत्येकी करावयास लागावे अशी आम्ही विनंती करून केवळ अेका रत्नागिरीचाच विचार जरी केला तरी कमीत कमी अेक आखाडा, स्वदेशीचा प्रचार, अस्पृश्यता निवारणाची पहिली पायरी म्हणून अेक अस्पृश्यात जाअून भजनाने अुपदेश करणारा मेळा आणि मिशनरी किंवा मौलवी याच्या जाळ्यात कोण कुठे फसत आहे त्यावर व्यक्तिश: डोळा ठेवून लोकांस त्यात अडकू न देण्याचा प्रयत्न करणे इतक्या तरी गोष्टी जर आपण त्वरित हाती घेतल्या नाहीत, तर पुढल्या वर्षी शिवोत्सव करण्याचा आपणाला मुळीच हक्क अुरणार नाही असे सांगितले होते.

ही आनंदाची गोष्ट आहे की अुत्साही व कार्यकर्त्या मंडळीनी या दिशेने काही तरी प्रयत्न सुरू केले आहेत. ते लोकांपुढे आले असता आणखी कित्येकांस कुठे व कसे प्रयत्न करावे हे कळून कामास लागण्यास प्रोत्साहन मिळेल या हेतूने गेल्या महिन्याचा रत्नागिरी नगरापुरता हा थोडा आढावा काढीत आहे.

मोठी कामे मोठी म्हणून हातून घडत नाहीत; लहान कामे यत्किंचित, त्यांनी ते काय व्हावयाचे म्हणून केली जात नाहीत, अशी जी आजकाल सार्वजनिक शिथिलता आलेली आहे ती आपण सर्वांनी सोडून दिली पाहिजे. मोठी कामे झाली तर अुत्तमच. अेका घावासरशी दोन तुकडे होतील. पण तसे जोपर्यंत अलौकिक सामर्थ्य व शक्ती राष्ट्रात अुत्पन्न होत नाही तोपर्यंत ते सामर्थ्य अुत्पन्न व्हावे म्हणूनच राष्ट्रातील प्रत्येक

व्यक्तीने आपआपल्या परिस्थितीत जी लहान सहान कामे अुरकता येतील ती तरी अुरकून घेतली पाहिजेत. जोवर कर्तृत्वाचे मेघ अीश्वरी दयेच्या दक्षिण वायूवर आरूढ होअून व आकाशात चढून येअून ही सर्व तप्त पृथ्वी 'धराधर शतांनी' भिजवून चिंब, शीतल करीत नाहीत व तापी कूप-तडाग् पाण्याने तुडुंब भरवीत नाहीत तोपर्यंत थेंब थेंब का होअीना पण तळे साचविले पाहिजे. हे तत्त्व आपले ब्रीद वाक्य समजणारी काही माणसे तरी कामास लागली ही या महिन्याच्या आठवड्यातील पहिली लाभदायक गोष्ट होय.

अस्पृश्यतेच्या निर्दळणास्तव प्रथम अुपाय म्हणून महिन्यातून अेकदा वा दोनदा महार चांभारादीक आपल्या हिंदू बांधवाचे वसतीत जाअून हिंदूमात्रानी अेकत्र होअून अेक स्वराने भगवंताचे भजन करण्याचा अुपक्रम रत्नागिरीस गेल्या अेकादशीस करण्यात आला. त्याचा परिणाम अपेक्षेहूनही अुत्तम झाला. श्री. सीताराम पंत पटवर्धन व इतर अुत्साही व कार्योत्सुक मंडळी लवकरच अेक नित्याचे काम करणारा मेळा काढून व अस्पृश्यांस विशेष अुपकारक अशी पदे व अभंग त्यांस शिकवून प्रत्येक अेकादशीस व आवश्यक तर इतर प्रसंगी आपल्या पूर्वी अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या हिंदूबंधूचे वसतीस भेट देत रहाणार आहेत. परवाचे भजनाचे प्रसंगी महार मंडळीनी मंडप वगैरे घालून जो अुत्साह दाखविला व अभंग म्हणण्यात जे कौशल्य व जी भक्ती प्रदर्शित केली ती खरोखरीच प्रशंसनीय होती. इतर जातीतील मास मच्छर स्वत: खाणाऱ्या व प्रसंगी मार्गात झोकांडे देत जाताना आढळणाऱ्या ज्या अहंमन्य मनुष्यास 'महार फार गदळ लोक आहेत हो !' म्हणून अस्पश्यतेचे समर्थन करण्याची चटक लागली आहे त्यांनी परवा महारवाड्यातील त्यांची ती भजनाची टापटीप, भक्तीचा रस व आजुबाजूची शुद्धता पहाण्यास यावयाचे होते. पुढील अेकादशीसही तेथेच भजन असून जे कोणी विद्यार्थी मेळ्यात वा सद्गृहस्थ भजनास येअू अिच्छित असतील त्यांनी त्या वेळेस तिथे अवश्य यावे अशी आमची विनंती आहे.

तुमच्या आराम खूर्चीवर पडून महारवाड्यातील घाण निघणार नाही तर ती तुम्ही जाअून तिथे अुभे राहून, नरांची सेवा तीच नारायणाची सेवा, पतितांचे पालन ती पतितपावनाची पूजा असे समजून स्वत: जेव्हा ती घाण काढाल तेव्हा ती निघेल आणि जर ती महारवाड्यातील घाण न निघाली तर तिने केवळ महारवाड्यातील वातावरणच दूषित होणारे नाही पण हे तुमचे आराम खूर्चीचे 'स्पृश्य' वातावरणही



दूषित होअील व अेकाच भयंकर सामाजिक रोगाच्या साथीत सर्वांचा अेकत्रच बळी पडेल. प्लेगच्या साथीप्रमाणेच अवनतीची साथ ही गावच्या कोणत्याही भागात जरी अुद्भवली तरी ती आग वेळीच विझली नाही तर गावच स्वाहा करावयास सोडीत नाही.

रत्नागिरीप्रमाणेच शिरगावातही या महिन्यात अस्पृश्योद्धाराचे दृष्टीने-प्रमाणाने लहान परंतु महत्त्वाने मोठे असे तीन समारंभ झाले. हनुमानजयंतीस येथे नवीनच स्थापन झालेल्या हनुमानाचे देवळाभोवती प्रदक्षिणा सर्व हिंदूमात्रांनी मिळून घालण्याचा स्तुत्य अुपक्रम जो झाला तो इतर मोठमोठ्या नगरातूनही अनुकरण्यास योग्य आहे. त्याचे वर्णन 'बकुल' मध्ये व पुण्याच्या पत्रातही आलेलेच आहे. दुसरी गोष्ट म्हणजे तेथील चांभाराचे घरचा सत्यनारायणाच्या पूजेचे वेळी झालेला समारंभ हा होय. या वेळेसही ब्राह्मण कुळवाडी इत्यादी 'स्पृश्य' हिंदू व चांभारादीक 'अस्पृश्य' हिंदू सत्यनारायणाचे चरणांपुढे अेकत्र कथा किर्तनात समाविष्ट झालेले होते. सावरकरांचे भाषणात त्यांनी परमेश्वराचे सत्यस्वरूपाचा अुल्लेख व स्पष्टीकरण करून मिशनरी लोक अज्ञानी अस्पृश्यांस कसे कसे फसवितात ते सांगून त्यांचे कोटिक्रम कसे खंडावे ते सांगितले. नंतर 'तुम्ही आम्ही सकल हिंदू बंधू बंधू' हे पद झाल्यावर 'हिंदू धर्म की जय' या जयघोषात समारंभ संपविण्यात आला. त्याचप्रमाणे सावरकरांचे व श्रीयुत दामले यांचे घरी वासंतिक हळदी कुंकवाचे समारंभास सर्व हिंदू स्त्रियांस आमंत्रण दिले होते. ही नवीन पद्धत पचनी पाडताना अेकदोन सांगण्यासारख्या गमती झाल्या. महारांचे स्त्रियांस बोलावणे करण्यास कुळवाडी स्त्री कोणी जाअीना. जी ती अैकताच हसे व म्हणे 'इश्श्' महारणींना का कोणी हळीद कुंकवाला बोलावतो ! मी नाही जाणार ''अगं पण हे कुत्रे आपल्या ओट्यावर बसते तिथे ती माणसासारखी माणसे-आपल्या धर्माचे बंधू ते बसले व देवीचे दर्शन करू लागले तर त्यात तुला वावगे काय दिसते?'' ''ते खरे'' ''मग तू बोलावू जात का नाहीस?'' ''मला काही वावगे दिसत नाही. पण लोक मला हसतील.''

हे 'लोक मला हसतील !' हेच जिथे तिथे नडते. पण अखेर लोकांचे हसणे लवकरच बंद झाले. अुलट ब्राह्मण स्त्रियांनी महार, चांभार इत्यादी अखिल हिंदू जातीय स्त्रियांस हळदकुंकू वाटण्याचे आनंदाने मान्य केले. पण महारणीनाही ते पचेना त्या आल्या; पण अगदी ओट्यावर त्यांच्या करिता इतर स्त्रियांशेजारी केलेल्या